पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १३

**सभावृत्तांत**

दिनांक - **०५/०४/२०१६** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **०५/०४/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सौ.स्वाती प्रमोद साने - सभापती**
२. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४. मा.जाधव साधना रामदास
५. मा.पालांडे सुजाता सुनिल
६. मा.पाटील सुजित वसंत
७. मा.चोंधे आरती सुरेश
८. मा.भालेकर अरुणा दिलीप
९. मा.बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.कळसकर – कार्यालय अधिक्षक, मा.तुपसाखरे - उपअभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) प्रभाग क्र.६१ मधील महात्मा फुलेनगर झोपडपट्टीमधील स्थापत्य विषयक कामाची देखभाल दुरुस्ती करणे या कामाच्या वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत – मा.सुजाता पालांडे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.६१ जयभिमनगर झोपडपट्टीतील स्थापत्य विषयक कामाची देखभाल दुरुस्ती करणे या कामाच्या वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत – मा.सुजाता पालांडे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) सभा आयोजनाबाबत – मा.वसंत लोंढे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **०१/०३/२०१६ व १५/०३/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १२)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ५५ विषय क्रमांक – ०१

दिनांक – ०५/०४/२०१६ विभाग - नगररचना व विकास

सुचक – मा.निलेश बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५

विषय - पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी.हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व स.नं. १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे भूसंपादनाबाबत...

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५६ विषय क्रमांक – ०२

दिनांक – ०५/०४/२०१६ विभाग - नगररचना व विकास

सुचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१००८/२०१६, दि.२८/०३/२०१६

विषय – मौजे पिंपळे निलख येथील स.नं.२७ येथे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत मनपा रस्ता घोषित करणेकामी जागा आदलाबदल करणेबाबत महानगरपालिकेच्या ताब्यातील आरक्षणाने बाधित क्षेत्र रस्त्यासाठी देऊन बदल्यात निवासी विभागातील क्षेत्र मनपाचे ताब्यात घेणेबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ५७ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०५/०४/२०१६

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६१ मधील महात्मा फुलेनगर झोपडपट्टीमधील स्थापत्य विषयक कामाची देखभाल दुरुस्ती करण्याचे काम सन २०१४-१५ चे दरपत्रकाप्रमाणे निविदा क्र.१/५-२०१५-१६, निविदा र.रु.९,३३,३१०/- काढण्यात आले आहे. सदर काम १.५० टक्के कमी दराने मे.सिध्दीकी प्लंबींग अन्ड ड्रेनेज सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर यांना मिळाले आहे. सदर कामातून सदर झोपडपट्टीतील

काही भागात दुरुस्ती करण्यात आली आहे. तथापि स्थानिक सदर झोपडपट्टीत ड्रेनेजचे काम करण्यात आले असल्याने अंतर्गत बोळीचे कॉक्रीटीकरण, गटर दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने नगरसदस्यांचे मागणीनुसार अंतर्गत बोळीचे कॉक्रीटीकरण, गटर दुरुस्ती करावयाचे झाल्यास वर नमुद कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन सदर सुधारीत कामास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदर कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.२०,००,०००/- ( अक्षरी र.रु.वीस लाख फक्त ) ला प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५८ विषय क्रमांक – ०४

दिनांक – ०५/०४/२०१६

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६१ जयभिमनगर झोपडपट्टीतील स्थापत्य विषयक कामाची देखभाल दुरुस्ती करण्याचे काम सन २०१४-१५ चे दरपत्रकाप्रमाणे निविदा क्र.१/३८-२०१५-१६, निविदा र.रु.९,३३,३१०/- काढण्यात आले आहे. सदर काम १% टक्के जास्त दराने मे.सिध्दीकी प्लंबींग अन्ड ड्रेनेज सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर यांना मिळाले आहे. सदर कामातून सदर झोपडपट्टीतील काही भागात दुरूस्ती करण्यात आली आहे. तथापि स्थानिक सदर झोपडपट्टीत ड्रेनेजचे काम करण्यात आले असल्याने अंतर्गत बोळीचे कॉक्रीटीकरण, गटर दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने नगरसदस्यांचे मागणीनुसार अंतर्गत बोळीचे कॉक्रीटीकरण, गटर दुरुस्ती करावयाचे झाल्यास वर नमुद कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन सदर सुधारीत कामास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदर कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.२०,००,०००/- ( अक्षरी र.रु.वीस लाख फक्त ) ला प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९ विषय क्रमांक – ०५

दिनांक – ०५/०४/२०१६

सुचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक – मा.निलेश बारणे

संदर्भ – मा.वसंत लोंढे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा महिन्याच्या पहिल्या व तिस-या गुरुवारी दुपारी ३.०० वा. स्थायी समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापी सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी/सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वा. सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सौ.स्वाती प्रमोद साने )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१९३/२०१६
दिनांक : ०५/०४/२०१६

सही/-
**कार्यालय अधिक्षक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.